| MHKO070000862023 | **म.सं.कौं.हिं.का. अर्ज ५/२०२३**<br>स्नेहल अमित मगदुम आणि इतर<br>वि.<br>अमित सुकूमार मगदुम आणि इतर |
|---|---|

नि.क्र.७६ खालील आदेश

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अर्जदाराने त्यांच्या अर्जामध्ये टी.व्ही. सुविधेविषयी, अर्जदार क्र.१ यांचे आई–वडील व भाऊ यांना घरामध्ये प्रवेश करुन अर्जदारास भेटणेस प्रतिबंध करु नये असा संरक्षणात्मक आदेश मिळणेकामी, स्कुल बस फी व शिक्षणाची फी देणेविषयी, अर्जदार क्र.१ यांचा मोबाईल गॅस कनेक्शनसाठी रजिस्टर करणेबाबत आदेश होणेकामी सदर अर्जामध्ये विनंती केली आहे. विरुध्द बाजुने सदर अर्जास तीव्र आक्षेप नोंदवुन अर्ज नामंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

०३. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हा महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. याठिकाणी एक अत्यंत महत्वाची बाब नमुद करणे गरजेचे आहे ती म्हणजे अर्जदार व वि.प. यांनी नि.क्र.६६ ला पुरसिस दाखल करुन कलम नं.१ (a to f) प्रमाणे अंतरिम आदेश होणेस उभय पक्षांची हरकत नसल्याचे कथन केले आहे. त्यानुसार आदेशही पारित करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता प्रकरण पुराव्यासाठी लागलेले आहे. त्यामुळे दोन्ही बाजुंना या क्षणी त्याच्या बाहेर जावुन मागणी करता येणार नाही. तसेच त्यामध्ये नमुद प्रमाणे जर कोणी पालन केले नाही तर दुस–या बाजुस पुढील कार्यवाही करण्याची मुभा असणार आहे.

०४. नि.क्र.६६ मध्ये टेलिव्हीजन बाबत नमुद नाही. त्यामुळे अर्जदाराला या क्षणी त्या अनुषंगाने मागणी करता येणार नाही. तसेच नि.क्र.६६ मध्ये नमुद आहे की, वर नमुद खर्चाव्यतिरिक्त कोणताही इतर खर्च वि.प.क्र.१ करणार नसुन त्यांचेवर तो बंधनकारक नाही. सदर तडजोड पुरसिस नुसार गॅस साठी देखील अंतरिम पोटगी दिली आहे. त्यामुळे अर्जदाराचा नंबर त्याठिकाणी देण्याचा आदेश होणे हे संयुक्तीक होणार नाही. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार क्र.१ चे आई–वडील व भाऊ हे पक्षकार नाहीत. तसेच त्यांच्यातील वाद पाहिला असता त्याअनुषंगाने भेटण्याची मुभा अगर संरक्षणात्मक आदेश दिला तर निश्चीतच वादामध्ये भर पडणार आहे. तसेच अर्जदार क्र.२ व ३ च्या समोर वारंवार वाद झाले तर निश्चीतच त्याचा परिणाम त्यांच्यावर देखील होणार आहे. कारण की, त्यांच्यामध्ये याआधी देखील केसेस झाल्याचे दिसुन येत आहे. तसेच अर्जदार यांना जर त्यांना त्यांचे आई–वडील व भाऊ यांना भेटायचे असेल तर ते त्यांच्या घरी जावू शकतात. त्यामुळे त्या मागणीस देखील अर्जदार पात्र असल्याचे दिसुन येत नाही. स्कूल बस, शिक्षण व त्या अनुषंगाने फीस बाबत तडजोड पुरसिसमध्ये नमुद आहे. त्यामुळे पुन्हा त्याबाबत आदेश होणे हे संयुक्तीक होणार नाही. जर जाबदाराने त्या तडजोड पुरसिसचा भंग केला असे अर्जदारास वाटत असेल तर अर्जदार पुढील कायदयाची मदत घेवू शकतात. त्यामुळे या क्षणी नि.क्र.६६ च्या तडजोड पुरसिसच्या बाहेर जाता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर होणेस पात्र नाही. करीता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.७६ हा नामंजूर करणेत येतो.

२. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.01.08 17:46:55 +0530

जयसिंगपूर

दिनांक–०८/०१/२०२६

**(अ. त्रिं. मनगिरे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 08/01/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 08/01/2026. |
| Judgment/order uploaded on | 08/01/2026. |